## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश

जा.क्र.उपनि/वसई/बी.१/अल्पाा हौ/क.७७(अ)/ /२०१७/१२८६
उपनिबंधक सहकारी संस्था वसई तालुका यांचे कार्यालय
तामतलाव, जॉनी क्रॉस गल्ली, ता. वसई, जि. ठाणे
दिनांक :-१२/०७/२०१७

वाचले :- १) श्री.बी.पी.देशमुख,३ रे अप्पर उपलेखापरिक्षक,सहकारी संस्था,ठाणे यांचा दि.२४/४/२०१५ चा लेखापरिक्षण अहवाल.

२) सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,पालघर तथा चौकशी अधिकारी यांचा दि.१९/०१/२०१६ रोजी या कार्यालयात सादर केलेला कलम ८३ अन्वये चौकशी अहवाल.

३) या कार्यालयाचे कलम ७९(१) अन्वये दिनांक ३१/१/२०१६ रोजीचे निदेश.

४) या कार्यालयाचे कलम ७९(२) अन्वये दिनांक २९/११/२०१६ रोजीचे निदेश.

५) प्राधिकृत अधिकारी श्री.सुगंध विभूते यांचेकडील दिनांक / /२०१७ रोजीचा भेट अहवाल.

६) श्रीमती मेरी जॉनी सभासद अल्पा को.ऑप.हौसिंग सोसा.लि.माणिकपूर,वसई (प) ता.वसई जि.पालघर यांचकडील दिनांक ११/७/२०१७ रोजीचा अर्ज.

७) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतुद.

ज्याअर्थी, अल्पा को-ऑप.हौसिंग सोसा.लि. माणिकपूर पोलीस स्टेशनसमोर,शास्त्रीनगर, वसई रोड (प.) ता.वसई जि.पालघर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदीनूसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून ती या कार्यालयाचे अधिकार कक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, वाचले क्र. १ ने श्री. बी.पी. देशमुख, ३ रे अप्पर उपलेखापरिक्षक सहकारी संस्था, ठाणे यांनी संस्थेचे दि. ०१/०४/१९९८ ते ३१/०३/२०१२ या मुदतीची शासकीय लेखापरिक्षण करुन संस्थेच्या कामकाजामध्ये अनियमितता, आर्थिकबाबींवर गंभीर दोष लेखापरिक्षकांनी नमूद केले आहे. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१) दि.०८/०५/२०१५ रोजीच्या आदेशान्वये श्री. एस.बी.अंधारे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पालघर यांची संस्थेचे कामकाज व आर्थिकस्थितीची चौकशी करणेसाठी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानूसार त्यांनी चौकशी करुन चौकशी अहवाल वाचले क्र. २ ने या कार्यालयास सादर केलेला आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या कामकाजामध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या उणिवांवर म्हणजे १) संस्थेचे माजी सेक्रेटरी यांना संस्था रु. १,३६,३२९/- इतकी रक्कम देणे लागत असून चौकशी अंती ती शिल्लक देणे असे दिसून येत आहे. तरी सदर रक्कमेची चौकशी करुन संस्थेच्या व्यवहारामध्ये त्याची नोंद घ्यावी. २) प्रस्तुत चौकशीमध्ये भाग हंसतांतरणा संबंधात उपविधी क्र. ३८ नूसार प्रवेश फी, हस्तांतरण शुल्क, अधिमुल्याची रक्कम संबंधिताकडून नियमाप्रमाणे व उपविधीतील तरतूदीनूसा वसुल करण्यात न आल्यामुळे संस्थेचे रु. २,७९,९८०/- इतके आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर रक्कम संबंधित १६ लोकांकडून वसुल करण्याबाबत वाचले क्र. ३ ने निदेश देण्यात आले आहेत आणि,

ज्याअर्थी, संस्थेने कलम ७९(१) अन्वये दिलेल्या निदेशान्वये संस्थेने संबंधित सभासदांकडून आर्थिक नुकसानीची रक्कम वसुल करणे आवश्यक होते किंवा अशी रक्कम सदर सभासदांनी संस्थेकडे विहित मुदतीत भरणा करण्यांत कसूर केला असल्यास सदरची रक्कम त्यांचे देखभाल देयकात दर्शवून अशी रक्कम थकीत असल्याचे गृहीत धरुन थकीत देखभाल शुल्क वसुलीबाबत संबंधित सभासदांना रितसर नोटीसा देवून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अंतर्गत या कार्यालयात किंवा कलम ९१ अंतर्गत मा.सहकार न्यायालयात

Scanned by CamScanner

संबंधितांविरुध्द वसुलीचे दावे दाखल करणे आवश्यक असतानाही संस्थेने अशी कृती केलेली नाही.संस्थेने
कार्यालयाकडील वाचले क्रमांक ३ चे निदेशाचे पालन न केल्यामुळे उपरोक्त वाचले क्र. ४ अन्वये उचित कार्यवाही करणेसाठी श्री. सुंगध विभूते , सहकारी अधिकारी श्रेणी-२ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी संस्थेस भेट देवून वाचले क्रमांक ५ अन्वये भेट अहवाल कार्यालयास सादर केला. आणि,

ज्याअर्थी श्री.सुगंध विभूते,सहकारी अधिकारी श्रेणी-२ तथा प्राधिकृत अधिकारी अल्पा को.ऑप.हौसिंग सोसा.लि. माणिकपूर पोलीस स्टेशनसमोर,शास्त्रीनगर, वसई रोड (प.) ता.वसई जि.पालघर यांनी वाचले क्रमांक ५ अन्वये सादर केलेल्या भेट अहवालाचे अवलोकन केले असता संस्थेने कलम ८३ च्या चौकशी अहवालात नमूद आर्थिक नुकसानीची रक्कम रु. २,७९,९८०/-संबंधित सभासदांकडून वसुल करणेबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे तसेच अशी कारवाई करण्याचे अनुषंगाने संस्थेचे दप्तर उपलब्ध करुन दिले नसल्याचे त्यांचे अहवालावरुन दिसून येत आहे.आणि

ज्याअर्थी संस्थेच्या सभासद श्रीमती मेरी जॉनी ,सदनिका क्र.१०७ यांनी दिनांक ११/७/२०१ रोजीच्या पत्राने श्री.डी.डी.पाताडे-सचिव, श्री.अजित नायक-संचालक यांना या कार्यालयाकडील दिनांक ०६/१०/२०१५ रोजीच्या कलम ७५(५) च्या आदेशानुसार ५ वर्षाकरिता संस्था समितीवरुन काढून टाकण्यात आलेले आहे.,श्रीमती माधुरी जाधव - संचालक, श्री.दिनेश पटेल- खजिनदार यांनी त्यांच्या संचालक पदाचा राजीनामा अनुक्रमे दि.२४/८/२०१६ व दि.०४/७/२०१७ रोजी दिलेला आहे त्यामुळे सद्यस्थितीत संचालक मंडळावर केवळ ४ संचालक कार्यरत असल्याने संस्थेची समिती अल्पमतात आलेली आहे.त्यमुळे संस्थेची समिती बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी नेमणूकीबाबत कार्यवाही करावी असे कळविले आहे. आणि,

ज्याअर्थी अल्पा को-ऑप.हौसिंग सोसा.लि. माणिकपूर पोलीस स्टेशनसमोर,शास्त्रीनगर, वसई रोड (प.) ता.वसई जि.पालघर संस्थेच्या समितीची निवडणूक २६ एप्रिल २०१५ मध्ये झालेली असून सदर निवडणूकीमध्ये समितीसदस्य रितसर निवडून आल्याचे दिसून येत आहे.या कार्यालयाकडील दिनांक ०६/१०/२०१५ रोजीच्या कलम ७५(५) आदेशान्वये २ संचालकांना समितीच्या पुढील एक कालावधीसाठी समितीवर चालू राहण्यास अनर्ह ठरविण्यात आलेले आहे.श्रीमती मेरी जॉनी यांनी संदर्भ क्रमांक ७ चे पत्रासोबत श्रीमती माधुरी जाधव व श्री.दिनेश पटेल यांचे राजीनाता पत्र सादर केले आहे.त्यामुळे संस्था समितीवरील एकूण ८ संचालकांपैकी ४ संचालक समितीवर काम करण्यास अनर्ह ठरत असल्याने संस्थेची समिती अल्पमतात आल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.आणि,

त्याअर्थी अल्पा को-ऑप.हौसिंग सोसा.लि. माणिकपूर पोलीस स्टेशनसमोर,शास्त्रीनगर, वसई रोड (प.) ता.वसई जि.पालघर सस्थेवर सद्यस्थितीत संचालक मंडळ कार्यरत नसल्याबाबत माझी खात्री झाली आहे. सबब संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता प्राधिकृत अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक असल्याने खालिलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे.

## :- आदेश -:

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त अधिकारान्वये प्रियंका गाडीलकर, उप निबंधक, सहकारी संस्था,वसई अल्पा को-ऑप.हौसिंग सोसा.लि. माणिकपूर स्टेशनसमोर,शास्त्रीनगर, वसई रोड (प.) ता.वसई जि.पालघर या संस्थेची व्यवस्थापक बरखास्त करुन

Scanned by CamScanner

श्री. टि.एस.करकरे,सहकारी अधिकारी श्रेणी-१ अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था,वसई व श्रीमती मेरी जॉनी यांची प्राधिकृत अधिकारी मंडळ म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण पदभार घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.तसेच या कार्यालयाकडून पारित केलेल्या उपरोक्त नमूद निदेशातील तरतुदीनुसार संस्थेचे आर्थिक नुकसान भरुन काढण्याचे अनुषंगाने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी व संस्था संचालक मंडळाचे निवडणूकीचे अनुषंगाने सभासदांची यादी विहित नमुन्यात तयार करुन या कार्यालयास सादर करावी.

प्रस्तुत आदेश आज दि. १२/०७/२०१७ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह दिला असे.

उप-निबंधक सहकारी संस्था, वसई तालुका वसई

( प्रियंका गाडीलकर )
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, वसई.**

**प्रत,**

१.श्री. टि.एस.करकरे,सहकारी अधिकारी श्रेणी-१ अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था,वसई व श्रीमती मेरी जॉनी प्राधिकृत अधिकारी मंडळ अल्पा को-ऑप.हौसिंग सोसा.लि. माणिकपूर पोलीस स्टेशनसमोर,शास्त्रीनगर, वसई रोड (प.) ता.वसई जि.पालघर

२. चेअरमन, अल्पा को-ऑप.हौसिंग सोसा.लि. माणिकपूर पोलीस स्टेशनसमोर,शास्त्रीनगर, वसई रोड (प.) ता.वसई जि.पालघर

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा ,मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. शाखा व्यवस्थापक,ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा--वसई रोड.

Scanned by CamScanner

# उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई यांचे कार्यालय

जॉनी क्रॉस लेन, तामतलाव, वसई(प.) ता.वसई, जि.पालघर

३३२०

जा.क्र.उपनि/वसई/बी-१/प्र.अ.नि./बदल/क.७७/ १७
दिनांक :- १६/११/२०१७

वाचले :-१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) मधील तरतुद.
२.या कार्यालयाकडील आदेश क्र.उपनि/वसई/बी-१/अल्पाहौ/क.७७(अ)/१२६६/२०१७
दिनांक १२/०७/२०१७

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये अल्पा को.ऑप.हौसिंग सोसा.लि.माणिकपूर पोलिसस्टेशनसमोर,शास्त्रीनगर,वसई रोड,वसई (प) ता.वसई जि.पालघर संस्थेवर उक्त वाचले क्रमांक २ अन्वये श्री.टि.एस.करकरे, सहकारी अधिकारी श्रेणी-१ व श्रीमती मेरी जॉनी,सभासद अल्पा को.ऑप.हौसिंग सोसा.लि. यांची प्राधिकृत अधिकारी मंडळ म्हणून नेमणूक करण्यांत आलेली आहे.प्राधिकृत अधिकारी मंडळावर संस्थेच्या तक्रारदार सभासद श्रीमती मेरी जॉनी यांची नेमणूक केली असल्याने संस्थेच्या इतर सभासदांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. संस्थेच्या माजी पदाधिका-यांकडून संस्थेच्या दप्तराचा ताबा प्राधिकश्त अधिकारी मंडळास अदयाप अप्राप्त आहे.त्यामुळे संस्थेचे प्रशासकीय कामकाज ठप्प झालेले आहे. संस्थेचे प्रशासकीय कामकाज सुरुळीत होणेचे दृष्टीने प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा ताबा घेवून संस्थेचे कामकाज करणे आवश्यक आहे.सबब वाचले क्रमांक २ च्या आदेशात बदल करणे आवश्यक असल्याने वाचले क्रमांक २ च्या आदेशात अशंतः बदल करुन खालीलप्रमाणे नवीन प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | सध्याचे प्राधिकृत अधिकारी/मंडळ | नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | अल्पा को.ऑप.हौसिंग सोसा.लि.माणिकपूर पोलिसस्टेशनसमोर,शास्त्रीनगर,वसई रोड,वसई (प) ता.वसई जि.पालघर | श्री.टि.एस.करकरे, सहकारी अधिकारी श्रेणी-१-अध्यक्ष श्रीमती मेरी जॉनी-सदस्या | श्री.रॉकी घोन्सालवीस, तामतलाव,वसई |

नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी मंडळ यांनी संचालक मंडळ/माजी प्राधिकृ अधिकारी यांचेकडून संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा,कागदपत्रांचा त्वरीत ताबा घेवून प्रशासकीय कामकाज चालू करावयाचे आहे व याबाबतचा अहवाल वेळोवेळी य कार्यालयास सादर करावयाचा आहे.

प्रस्तुत आदेश आज दिनांक १६/११/२०१७ रोजी माझे सहि व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.

उप-निबंधक सहकारी संस्था, वसई
वसई तालुका वसई

उपनिबंधक
सहकारी संस्था,वसई.

प्रतिलिपी
१. श्री.टि.एस.करकरे, सहकारी अधिकारी श्रेणी-१ तथा माजी प्राधिकृत अधिकारी, अल्पा को.ऑप.हौसिंग सोसा.लि.माणिकपूर पोलिसस्टेशनसमोर,शास्त्रीनगर,वसई रोड,वसई (प) ता.वसई जि.पालघर
२. श्री.रॉकी घोन्सालवीस,तामतलाव,वसई तथा प्राधिकृत अधिकारी अल्पा को.ऑप.हौसिंग सोसा.लि.माणिकपूर पोलिसस्टेशनसमोर,शास्त्रीनगर,वसई रोड,वसई (प) ता.वसई जि.पालघर
३.अध्यक्ष/सचिव, अल्पा को.ऑप.हौसिंग सोसा.लि.माणिकपूर पोलिसस्टेशनसमोर,शास्त्रीनगर,वसई रोड,वसई (प) ता.वसई जि.पालघर

२/- संस्था अध्यक्ष/सचिव/माजी/आजी प्राधिकृत अधिकारी मंडळ यांचा सुचित करण्यांत येते की,संस्थेच्या दप्तराचा पदभार देणे/घेणे ची कार्यवाही त्वरीत करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**
शाखाधिकारी, दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि,शाखा-वसई रोड्

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,पालघर.

Scanned by CamScanner